# घार हिंडते आकाशी
# चित्त तिचे पिलांपाशी...



अमेरिकेत येऊन आपण मराठी माणसं या ओळी साक्षात अनुभवत असतो.आपलं महाराष्ट्रातलं घर, आपलं गाव, आपले बालपणापासूनचे सवंगडी, आपला कट्टा आणि चहाचं हॉटेल, आपले सण आणि उत्सव, आपली बोरं आणि जांभळं, आपले हापूस आणि पायरी आंबे यांच्या आठवणीने आपण कधी कधी हळवे होत असतो.



आपले सण उत्सव, आपले देव आणि मूर्ती, आपले संस्कार जिवंत ठेवण्यासाठी आपण मंदिरं उभारली, मंडळं स्थापन केली.

लोकवर्गणीवर उभी राहिलेली प्रसार माध्यमे आणि अन्य संस्था, मराठी भाषा ; संस्कार आणि संस्कृती, मराठी शाळा, शेती आणि पर्यावरण, सौर उर्जा अशा दुर्लक्षित विषयांकडे आपण सर्वसामान्य मराठी माणसांनी लक्ष देण्याची अतिशय आवश्यकता निर्माण झाली आहे.

त्यासाठी 'मराठी माणूस डॉट कॉम' या आपल्या सांस्कृतिक सहकार्याच्या निःस्वार्थ सेवाभावी उपक्रमाचा प्रारंभ झाला आहे. सभासदांच्या पंचवीस डॉलर्स एवढया छोटयाश्या वार्षिक वर्गणीतून मराठी संस्कृतीसाठी महत्वाचे छोटे छोटे उपक्रम करण्यास आपण प्रारंभ केला आहे.

## ❀ प्रकाशन उपक्रम

२००७ मध्ये 'कार्टूनयात्रा' हा व्यंगचित्रसंग्रह प्रकाशित करून तो सर्व वर्गणीदारांना मोफत देण्यात आला. २००८ साठी आपण तीन तासांची मनोरंजक डीव्हीडी प्रकाशित करणार आहोत.

## ❀ ज्ञानदीप पुरस्कार

दरवर्षी मराठीत प्रकाशित होणाऱ्या अभ्यासपूर्ण पुस्तकाला पाचशे डॉलर्सचा पुरस्कार आपल्या सभासदांच्या वर्गणीतून देण्यास आपण प्रारंभ केला आहे. २००७ चा ज्ञानदीप पुरस्कार आपण अपर्णा वेलणकरच्या 'फॉर हिअर ऑर टु गो' या पुस्तकाला दिला आहे.

## ❀ मराठी शाळा

इंग्रजी भाषेचा अस्थानी हव्यास आणि सरकारच्या आत्मघाती धोरणामुळे मातृभाषा आणि ज्ञानभाषेतील दरी वाढतच आहे. या बाबतीत काम करण्यासाठी, मराठी भाषेतील आधुनिक शैक्षणिक साहित्य निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी आपण 'मराठी शाळा डॉट कॉम' हा उपक्रम सुरु करत आहोत.

## ❀ शेती,पर्यावरण आणि सौर उर्जा

हजारो शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि सरकारची कृतिशून्यता आपल्याला सुन्न करून टाकते.पाणलोट क्षेत्र विकास, वृक्षसंवर्धन,निसर्ग शेती, गावठी बी बियाणांचे संवर्धन अशा मार्गांनी शेतीला पुनर्संजीवनी मिळते. सौर उर्जा प्रकल्पांनी परकीय खनिज तेल व विश्व प्रदूषण या दोन्ही महाभयानक प्रश्नांवर उत्तर मिळू शकेल.या अत्यंत निकडीच्या प्रश्नांवर आपण लोकशिक्षणाचे काम सुरु करीत आहोत.

www.marathimanoos.com

मराठी माणसाचे सांस्कृतिक व्यासपीठ

हे उपक्रम निरंतर ठेवण्यासाठी आपल्या सहयोगाची आवश्यकता आहे.'मराठी माणूस डॉट कॉम' हा व्यवसाय नव्हे तर आपली सांस्कृतिक चळवळ आहे. सभासदांच्या सूचनांनुसार कार्यक्रम ठरविण्यात येतात व सर्व पैसे उपक्रमांसाठीच खर्च करण्यात येतात.वर्गणीदारांना त्यावर्षीचे प्रकाशन (किंमत १० डॉ.) वर्गणीतच मिळते. जमाखर्चाचा दरवर्षाचा हिशोब सर्व सदस्यांना देण्यात येतो.

आपल्या २५ डॉलर्स वार्षिक वर्गणीसाठी पत्ता:

Milind Ranade
3260, N.Park Avenue
Philadelphia, PA 19140

milindranade@marathimanoos.com
Phone: 215 226 0969